**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३४ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०८.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३५ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०८.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवाजी नारायण वीर,<br>रा.औरंगाबाद. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अन्न धान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/ ३५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिवाजी नारायण वीर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद - श्री. एम. एल.पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०१० |

या प्रकरणाची यापूर्वी दि. १९.०४.२०११ रोजी सुनावणी झाली होती. यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे आयोगाने गंभीर दखल घेऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि.०१.०७.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.अपिलार्थी यांनी अन्नपूर्णा या योजनेखाली वय वर्षे ६५ च्या वरील व्यक्तींना एकूण १० किलोग्रॅम धान्य देण्यात येते, अशा औरंगाबाद शहरामध्ये सर्व रेशन दुकानांवरील लाभधारकांची यादी व त्या लाभधारकांचे संपूर्ण नाव व पत्ता तसेच ते लाभधारक या योनजेचया किती वर्षांपासून लाभ घेतात, याची स्वस्तधान्य दुकानाच्या तपशीलासह दुकाननिहायसविस्तर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात चुकून 'अन्नपूर्णा' ऐवजी 'अंत्योदय' असे नमूद केलेले आहे.ही बाब सुनावणीच्या वेळी त्यांनी मान्य केली आहे. सदरचा अर्ज दि. २९.१०.२००९ रोजीचा आहे व त्यासंदर्भातील माहिती दि. २८.०६.२०११ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पोस्टाने पाठविण्यात आली आहे. ते सुनावणीच्या वेळी मान्य केले व त्यामध्ये अपिलार्थीस काही माहिती अपूर्ण वाटत आहे व सर्व दुकानांची माहिती नाही, असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, औरंगाबाद शहरातील जेवढे नागरिक वय वर्षे ६५ च्या वरील आहेत व ज्या दुकानांमध्ये लाभार्थी आहेत त्याचा तपशील दिला आहे. याचा अर्थ असा आहे की, उर्वरित दुकानांमध्ये ही योजना राबविण्यात येत नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची एक प्रत आयोगाचे सूचनेप्रमाणे पुन्हा अपिलार्थीस देण्यात आली.त्याचप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भात माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. तथापि माहिती पुरविण्यास प्रदीर्घ विलंब झाल्याचे आढळून येत आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ३१.१२.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तरी ही माहिती देण्यास विलंब झाला आहे. याकरिता तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी हे शास्तीस पात्र होत आहेत. त्यांना ₹२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये यासंदर्भात अधिनियमातील कलम २०(१) च्या परंतुकानुसार जिल्हाधिकारी यांचेमार्फत आयोगास खुलासा द्यावा लागेल.सदर आदेशाची प्रत संबंधितांना तामिल करण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी/ अपर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी यांची राहील.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना ₹२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये यासंदर्भात अधिनियमातील कलम २०(१) च्या परंतुकानुसार जिल्हाधिकारी यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी नारायण वीर, हिमायतबाग, भिमराजनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख इलियास,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद - श्री. एम.एल.पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १९.०४.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात

आज दि. ०१.०७.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे दुकान क्र. ३४ व ३७ या दोन स्वस्तधान्य दुकानासंदर्भात माहिती मागितलेली आहे. या संदर्भात दोनही दुकानांची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दुकान क्र.३७ बाबत अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे, अशी लेखी स्वरुपात पोच दिलेली आहे. त्याचप्रमाणे दुकान क्र.३४ संदर्भातील माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविली आहे. तथापि पोस्टाचा लिफाफा त्यांच्याकडे परत प्राप्त झाला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना दुकान क्र.३४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या दुकान क्र.३४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इलियास, माहिती सेवा समिती, दक्षता अधिकारी, छावणी कॅन्टोनमेंट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुलाम फैय्याज पिता गुलाम, : अपीलकर्ता
औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
बी.एफ.सी.आय.इंग्रजी माध्यमिक शाळा,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गुलाम फैय्याज पिता गुलाम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, बी.एफ.सी.आय.इंग्रजी माध्यमिक शाळा, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. अ.रा.चव्हाण,अधीक्षक,वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०२.२०१० |

या प्रकरणाची यापूर्वी दि. १९.०४.२०११ रोजी सुनावणी झाली होती. यावेळी अपिलार्थी, व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक

वाटल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि.०१.०७.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मुख्याध्यापक यांच्या कार्यालयात दाखविण्यात आली आहे. तथापि त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती द्यावी, असा निर्णय दिला आहे.

मुख्याध्यापक यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांची शाळा ही पूर्णपणे विनाअनुदानित आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम त्यांना लागू होत नाही. अपिलार्थी यांनी सांगितले की, त्यांना यावर्षी ₹२,००,०००/- अनुदान मिळाले आहे. यावर मुख्याध्यापक यांनी खुलासा केला की, सदरचे अनुदान एकरकमी प्रयोगशाळेच्या निर्माणाकरिता मिळालेला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, सदरचा शाळा पूर्णपणे विनाअनुदानित आहे. त्यांच्या शाळेस एकदा एकरकमी अनुदान मिळाले आहे. त्या रकमेमुळे त्यांची शाळा अनुदानित होऊ शकत नाही. म्हणून माहिती अधिकार अधिनियम त्यांना लागू होत नाही. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये केलेल्या माहिती च्या व्याख्येनुसार खाजगी संस्थेकडून कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास जी माहिती प्राप्त होऊ शकते, ती माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या तेरा मुद्यांवरील माहितीपैकी जी माहिती शिक्षणाधिकारी (मा) यांच्याकडे उपलब्ध होऊ शकते व सध्या उपलब्ध आहे, ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय होत असलेली व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम फैय्याज पिता गुलाम मोहम्मद, रा.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,बी.एफ.सी.आय.इंग्रजी माध्यमिक शाळा,दिल्ली गेट,रोजा बाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महंमद अब्दुल अजीज, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वक्फ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महंमद अब्दुल अजीज | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद - श्री.सय्यद फैज | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एस.एन.जफर,वक्फ अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |

या प्रकरणात यापूर्वी दि. १९.०४.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते, त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे

ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. ०१.०७.२०११ रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली आहे व प्रत्येक मुद्यावर ३-४ वेगवेगळे अहवाल आहेत. त्यामुळे नेमकी कोणती माहिती द्यावयाची याबाबत संभ्रम होत आहे. अपिलार्थी यांना माहितीची पाहणी दिली आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, त्यांना अशी माहिती पाहणीसाठी मिळाली नाही.अपिलार्थी वृध्द नागरिक आहेत व त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. २५.०९.२००९ रोजीचा आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे ज्या नस्तीमध्ये उपलब्ध आहे, त्या सर्व संचिका राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबादच्या कार्यालयामध्ये दि. ०४.०७.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाचे कक्ष अधिकारी यांच्या निगराणीखाली एक विशेष बाब म्हणून जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थितीत सकाळी ठीक ११.०० ते सायं.०५.०० या कालावधीत पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्याव्या लागतील व त्यामधून अपिलार्थीस आवश्यक असलेले काही कागदपत्रे छायाप्रतीच्या स्वरुपात विनामूल्य द्यावी लागतील.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे ज्या नस्तीमध्ये उपलब्ध आहेत,त्या सर्व संचिका राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद येथे दि. ०४.०७.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाचे कक्ष अधिकारी यांच्या निगराणीखाली जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या उपस्थितीत सकाळी ठीक ११.०० ते सायं.०५.०० या कालावधीत अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यामधून अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायाप्रतीच्या स्वरुपात विनामूल्य द्यावीत.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महंमद अब्दुल अजीज मुतवली मस्जीद, बागशेरजंग, दाऊदपुरा, मस्जीद कम्पाऊंड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तुकाराम गणपतराव शिंदे, : अपीलकर्ता
रा.मानवत, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअधीक्षक भूमी अभिलेख,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तुकाराम गणपतराव शिंदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक भूमी अभिलेख,मानवत,जि.परभणी - श्री. एस.डी.मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, परभणी - श्री. एम.जी.शहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि.०७.१२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये, त्यांच्या दि.३१.०३.२००८

रोजीच्या अर्जान्वये स.नं.४३७/१ मधील जमिनीची  मोजणी करुन केलेल्या कार्यवाहीसंदर्भात माहिती व संबंधित संचिकेची साक्षांकित प्रत मागितली आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, मानवत यांनी दि. ०८.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे की, तांत्रिक अडचणीमुळे सदरची नस्ती उपलब्ध होत नाही. ती उपलब्ध होताच आपणास कागदपत्रे पुरविण्यात येतील. पुनश्च् दि. ०१.०१.२०११ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक यांनी अपिलार्थीस नस्ती शोधण्याकरिता एक महिना लागेल, असे कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ३१.०१.२०११ रोजी अपिलार्थी यांचे अपील मान्य करुन एका महिन्याचे आत अर्जदारास माहिती पुरविण्यात यावी व संचिका शोधूनही उपलब्ध झाली नाही तर संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात यावी, असा निर्णय घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे अभिप्राय असे आहेत की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संचिकेचा शोध घ्यावा लागेल.  ती प्राप्त झाल्यास अपिलार्थीने  त्यांच्या  मूळ  अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल व संचिका प्राप्त झाली नाही तर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रक्रिया सहा महिन्याच्या आत पूर्ण करावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांनी नमूद केलेल्या संदर्भित दि.३१.०३.२००८ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने शुल्क ₹३०००/- चा भरणा केल्याचे दिसून येत आहे. यावर निर्णय झाला नाही म्हणून  अपिलार्थीस आजमितीस ₹३०००/- इतक्या रकमेस मुकावे लागले आहे. या  सर्व बाबी व झालेला विलंब यामुळे अपिलार्थीस नुकसान भरपाई देय होत आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८)(ख)च्या तरतुदीअन्वये आयोगास दिलेल्या अधिकारानुसार अपिलार्थीस ₹३०००/- इतक्या रकमेची नुकसान भरपाई अपिलार्थीस देण्यास संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास फर्मावण्यात येत आहे. नुकसान भरपाईची ही रक्कम जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक भूमी अभिलेख, मानवत यांना त्यांच्या कार्यालयाकडून एक महिन्याचे आत अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१) अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संचिकेचा शोध घेऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध लागला नाही तर, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही योजावी, ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच सहा महिन्याचे आत पूर्ण करावी.

३) अपिलार्थीस ₹३०००/- इतक्या रकमेची नुकसान भरपाई उपअधीक्षक भूमी अभिलेख, मानवत, जि.परभणी या सार्वजनिक प्राधिकरणाने हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस अदा करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुकाराम गणपतराव शिंदे, गोसावी गल्ली, कुंभार गल्ली, मानवत, ता.मानवत,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमी अभिलेख, मानवत,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितीन माणिकराव देशमुख, : अपीलकर्ता
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२८४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नितीन माणिकराव देशमुख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,परभणी- श्री. आर. के. कोलगणे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.०२.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २४.०१.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दि. ०१.०१.२०१० पासून दि. २४.०१.२०११ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या माहितीसाठीच्या

अर्जाच्या प्रती, त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती इत्यादीवर पाच मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती पुरविण्याकरिता एकूण शुल्क ₹७८८/-, ₹१४०/- व ₹८८०/- चा भरणा करण्याबाबत लेखाशीर्षासह दि. ०५.०२.२०११ व २८.०२.२०११ च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी शुल्काचा भरणा करण्याचा व्यक्तिश: जाऊन प्रयत्न केला, तसेच शुल्काची रक्कम मनीऑर्डरद्वारे पाठविली. तथापि ती अस्वीकृत झाली.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २९.०३.२०११ रोजी अपिलार्थीचे अपील मान्य करुन निर्णय दिला आहे की,अपिलार्थीस कार्यालयात कागदपत्रे पाहणीकरिता उपलब्ध करुन द्यावेत. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. कारण जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटीचे शुल्क भरण्याबाबत अपिलार्थीस कळविले आहे. यामुळे त्यांना माहितीची कागदपत्रे छायाप्रतींच्या स्वरुपात अपिलार्थीस देणे उचित आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती विनामूल्य द्यावी लागेल. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन माणिकराव देशमुख,द्वारा ॲड. झरीकर, नारायणचाळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नितीन माणिकराव देशमुख,<br>रा.परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (म.),<br>तहसील कार्यालय,परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नितीन माणिकराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म.),<br>तहसील कार्यालय,परभणी - श्री. आर.के.कोलगणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०४.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे दि.०३.०४.२००८ ते २३.०२.२०११

पर्यंत मंडळ अधिकारी, मौ.झरी यांच्या दप्तर फेरफारासंदर्भात केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती तहसीलदार कार्यालयात असणे आवश्यक आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १३.०४.२०११ रोजी निर्णय दिल्याचे दिसून येत आहे की, मंडळ अधिकारी मौजे झरी, तलाठी सजा,झरी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. कारण अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज तहसील कार्यालयात केलेला आहे व कार्यवाही तहसीलदार कार्यालयाकडून होणे आवश्यक आहे. यास्तव ही माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. या सर्व बाबी विचारात घेता आता अपिलार्थीस जन माहितीअधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती विनामूल्य द्यावी लागेल. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन माणिकराव देशमुख,द्वारा ॲड. झरीकर, नारायणचाळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अविनाश ज्ञानेश्वर गरुड, : अपीलकर्ता
रा. वसमत, जि.हिंगोली.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी
कार्यालय,हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, निवड समिती, जिल्हाधिकारी
कार्यालय,हिंगोली.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३०१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अविनाश ज्ञानेश्वर गरुड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर त्यांच्या युक्तिवादात प्रतिपादन केले की, त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी

यांनी अपिलार्थीच्या दि. ११.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जिल्हाधिकारी,हिंगोली यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.११.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश ज्ञानेश्वर गरुड, पूर्णा पाटबंधारे प्रकल्प वसाहत, वसमत,जि.हिंगोली - ४३१५१२.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा निवड समिती, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. टी. के. शेख, : अपीलकर्ता
रा. परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा,जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा,जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. डाके एम.पी.,कनिष्ठ अभियंत्याचे सहायक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. तोडे ए.के.शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दि. ३०.०६.२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः घेतली असून त्यासंदर्भात पोच दिलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. टी.के.शेख, वजीराबाद नगर, रामेश्वर प्लॉट, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, पंचायत समिती, पूर्णा,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. एस.आर.गरुड,<br>रा.पिंगळी (स्टेशन), ता.जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.९,लोहगाव,परभणी-१० | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र,२, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता,जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.१०,परभणी - श्री. राम खंडेराव दराडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२, परभणी - श्री. हेमंत मनोहरराव खोरगडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १८.०२.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये क्षेत्र पिंगळी पाट क्र.७० या कालव्यास हानी झाल्यासंदर्भात विविध एकूण १३ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. सदरची माहिती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. तसेच अपिलार्थी यांनी बहुतांश प्रश्नार्थक व स्पष्टीकरणात्मक माहिती मागितली आहे. तरीही त्यामागे अपिलार्थीस कोणती माहिती अभिप्रेत आहे, हे विचारात घेऊन दि. १६.०३.२०११ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती (एकूण १३ पृष्ठे) देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ती माहिती व्यक्तिशः स्वीकारली आहे. यासंदर्भातील पोच जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस.आर.गरुड,मु.पो.पिंगळी(रेल्वे स्टेशन),ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.१०,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेभाऊ प्रकाशराव बोबडे, : अपीलकर्ता
रा.वाघी (बो.), ता.जिंतूर, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, कौसडी, ता.जिंतूर,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,
जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेभाऊ प्रकाशराव बोबडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कौसडी,ता.जिंतूर,जि.परभणी - डॉ.एम.आर.दीक्षित | : | उपस्थित |
| ३.३ | तालुका आरोग्य अधिकारी,जिंतूर,जि.परभणी - डॉ.आर.एम.काझी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०५-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व तालुका आरोग्य अधिकारी, ता.जिंतूर उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कौसडी,ता.जिंतूर,जि.परभणी यांनी आयोगास अवगत केले की, सदर प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांचा प्रथम अपील अर्ज तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती,जिंतूर यांच्याकडे सादर केला आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी हे प्रथम अपिलीय अधिकारी आहेत. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या संदर्भित प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांच्याकडे प्रकरण अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या व प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेभाऊ प्रकाशराव बोबडे,रा.वाघी (बो.), ता.जिंतूर, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कौसडी,ता.जिंतूर,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांना (अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या व प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह)या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल,<br>रा.परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - (१)अव्वल कारकुन (लेखा विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर - श्री. आर. एन. शिंदे (२) लिपीक, वि.भू.सं.अ. स्वर्णाप्रकल्प, लातूर - श्री. पोतदार ए.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०५-२०११ |

अपिलार्थी यांचे विचाराधीन द्वितीय अपील अधिनियमातील कलम १९(३)च्या परंतुकानुसार विहीत मुदतीत प्राप्त झालेले नसून विलंबाने सादर झालेले आहे. तसेच या विलंबाकरिता त्यांनी संयुक्तिक कारण दिलेले नाही. तथापि विशेष बाब म्हणून प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करुन घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा दि. १२.१०.२०१० रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांच्या मे १९९५ ते मार्च, १९९६ या कालावधीतील अभिलेखाची पडताळणी केली असता अपिलार्थी यांचे उक्त कालावधीतील वेतन त्यांच्या कार्यालयातून अदा करण्यात आले आहे. ही बाब दि. १४.१२.२०१० रोजी कळविण्यात येऊन त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १४.१२.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर यांना प्राप्त झाला नसेल तर प्रथम अपिलासोबत दाखल करण्यात आलेल्या अर्जाची छायाप्रत पाठविण्यात येत असून विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर यांनी सदर माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार अपिलार्थीस तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प लातूर यांनी दि. २०.०६.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. अपिलार्थीचे द्वितीय अपील दि. २६.०२.२०११ रोजीचे असून अपिलार्थीस तदनंतर माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या माहितीची प्रथम पाहणी करावी. त्या माहितीमध्ये काही अपूर्ण असल्यास नेमके मुद्दे पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावेत. पुढील पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना त्या मुद्यांसंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास त्यासंदर्भातील माहिती पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, निशांत, वैभवनगर, जिंतूररोड,परभणी- ४३१४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (लेखा विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, वि.भू.सं.अ. स्वर्णाप्रकल्प, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मंगेश, महेश,नेहा चंदेल,<br>रा.परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणपत्र समिती क्र.१, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - संशोधन अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,औरंगाबाद-श्रीमती छाया के. कुलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,औरंगाबाद- श्री. बी.व्ही.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २२.०२.२०१० रोजी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये विद्यार्थी तथा पाल्य श्री. मंगेशसिंह महेशसिंह नेहा चंदेल यांनी राजपूत भामटा जातीचे प्रमाणपत्र मिळणेसाठी केलेले विनंती अर्ज उपविभागीय अधिकारी महसूल उपविभाग कार्यालय परभणीने फेटाळले आहे म्हणून अपील दाखल केले आहे, असा मजकूर 'माहिती आवश्यक असलेल्या माहिती'च्या वर्णनात नमूद केला आहे. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' च्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे अपिलार्थीस दि. १५.०३.२०१० अन्वये अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०४.०६.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पाठविली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,औरंगाबाद यांनी माहिती देण्यासंदर्भात घेतलेला निर्णय यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महेश, मंगेश,नेहा चंदेल, द्वारा हिरासिंग गुलाबसिंग चंदेल, निशांत वैभवनगर,जिंतूर रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किरण रमेश स्वामी, : अपिलार्थी
रा.सोनपेठ, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किरण रमेश स्वामी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, परभणी - प्रतिनिधी - श्री. एल.टी.चव्हाण, तहसीलदार, सोनपेठ, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, परभणी - प्रतिनिधी - श्री.पी.पी.वाकोडकर, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीतील प्रश्नार्थक स्वरुपातील माहिती वगळून देय असलेली व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि. १७.०३.२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाली आहे, ही बाब मान्य केली. तथापि त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे, असे मोघम स्वरुपात त्यांच्या द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे. यामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता ज्या कार्यालयाशी संबंधित माहिती आहे, त्या कार्यालयाकडे स्वतंत्ररित्या अर्ज करतील, असे त्यांनी मान्य केले.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण रमेश स्वामी, स्वामी इलेक्ट्रीक ॲन्ड वर्क्स, नगर परिषदेसमोर, मु.पो.सोनपेठ, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विजय मंकय्या कारेंगल्लु,<br>रा. परभणी. | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकीत्सक,<br>सामान्य रुग्णालय, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजय मंकय्या कारेंगल्लु | : | उपस्थित |
| ३.२ | सहायक माहिती अधिकारी - श्री. एस.बी.जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, परभणी - श्री. एस.जी.धिरडीकर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,सहायक जन माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत रद्द झालेल्या वर्ग-४ पदाच्या भरतीबाबत एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दि. ३०.१२.२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी सदर बाब मान्य केली. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती बरोबर आहे किंवा कसे, असा मुद्दा उपस्थित केला. यावर प्रशासकीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती बरोबर आहे, असे सांगितले. मुद्दा क्र.२ व ३ ची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये नाही. त्यामुळे ती देता येत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.विजय मंकय्या कारेंगल्लु, रोशन खाँ मोहल्ला, बारादरी मशदीच्या बाजुला, सरकारी दवाखान्याजवळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. काजी अजगर खान हयात खान,<br>रा.खंडाळा, ता.जि.हिंगोली. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय पोलीस हिंगोली (ग्रामीण) | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधिकारी, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. काजी अजगर खान हयात खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक, हिंगोली (ग्रा) - श्री. पेरके माणिक शिवराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक,परभणी- श्री. जाधव रमेश उत्तम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०५-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसाठी ₹१४/-इतके शुल्क जमा करावे, असे दि. ११.०३.२०११ रोजी

कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१.०४.२०११ रोजी निर्णय दिलेला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली असल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना खोटी माहिती दिली, असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. आयोगाने पृच्छा केली असता, त्यांना १,३,४ व ५ या मुद्यांसंदर्भातील माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे. तथापि श्री.वैजनाथ अप्पा व श्री. शिवचरण या दोन त्रयस्थ व्यक्तींच्या पोलीस स्टेशन ग्रामीणला घेतलेल्या बयानाची नक्कल प्राप्त झाली नाही, असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे सांगितले. त्यामुळे देता येत नाही.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची प्रत त्यांना देण्यात आलेली आहे. दोन त्रयस्थ व्यक्तींची घेतलेल्या बयानाची नक्कल उपलब्ध नसल्यामुळे त्यांना देता आली नाही. त्रयस्थांनी दिलेल्या बयानाची नक्कल कलम 8(1)(g) अन्वये देय होणार नाही, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काजी अजगरखाँ हयातखाँ पठाण, रा.खंडाळा,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, हिंगोली (ग्रा) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सौदागर म.रफीक पाशामियाँ, : अपीलकर्ता
रा. वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी, जि.लातूर- श्री. आर.डी.नांगरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, लातूर - प्रतिनिधी -श्री. पी.व्ही.नवसारे, उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जि.लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |

या प्रकरणाची यापूर्वी दि. १६.०३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. ०१.०७.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी, जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जुनी होती. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला की, अपिलार्थी यांच्याकडून मूळ अर्जातील मुद्यांबाबतचा तपशील घेण्यात यावा व त्याप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार देय होत असलेली माहिती देण्यात यावी. त्यानुसार अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांचे दि. ३०.०६.२०११ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये त्यांनी आज रोजी विचाराधीन द्वितीय अपिलाच्या संदर्भातील मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती मिळाल्याने सदरचे द्वितीय अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सौदागर म.रफीक पाशामियाँ, वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, : अपीलकर्ता
रा.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी -प्रतिनिधी - श्री. वांबुरकर एस.व्ही., नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,सेलू,जि.परभणी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,परभणी - प्रतिनिधी - श्री. वाकोडकर पी.पी., अव्वल कारकुन. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-१०-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २९.०३.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. ०१.०७.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. आज

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १२.०३.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती दि.०४.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त झाली अशी दि.०६.०४.२००९ रोजी पोच दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगापुढे असे सांगितले की, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे त्यांना देण्यात आलेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे नमूद करुन प्रथम अपील सादर केले. या अपिलावर घेण्यात आलेल्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २७.०७.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू यांनी दिल्याचे स्पष्ट होत आहे व अपील अमान्य करण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. अपिलार्थी आज रोजी सुध्दा अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे याच अर्जाच्या संदर्भात तहसीलदार, मानवत,पाथरी,जिंतूर यांनी सुध्दा अपिलार्थीस परस्पर माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढण्याच्या घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे पाथरीकर, इंदिरानगर,मु.पो.पाथरी,जि.परभणी-४३१५०६.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोकळे किशन काशिबा, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, हदगाव, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२५६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोकळे किशन काशिबा | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. रामा सोळंके व बालाजी वाघमारे | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-१२-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०६.०४.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आज दि. ०१.०७.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट पि.नं.२८८७/१९८९ मध्ये आदेश दि.१८.१०.१९८९ व १९.०३.२००४ अन्वये दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची नक्कल मागितली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेणे आवश्यक राहील. तदनंतर अपिलार्थीस देय असलेली माहिती देण्यासंदर्भात यथायोग्य निर्णय घ्यावा लागेल. यासाठी त्यांच्याकडे प्रकरण अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.३०.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोकळे किशन काशिबा,विभागीय गोदाम निरीक्षक (पु.),औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद (पुरवठा विभाग)

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजू सुर्यभान हिवराळे,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-१०-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १९.०४.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आज दि. ०१.०७.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी आज देखील अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची गंभीर दखल घेऊन सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी

संबंधित जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी स्वतः आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू सूर्यभान हिवराळे, रा.जयभीमनगर,टाऊनहॉल,गुलाबवाडी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरे बालाजी माधवराव,<br>रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>सचिव,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी | : | उत्तरवादी |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३६ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०८.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३७ | | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. | ०५-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१.०८.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/अ.प./१४०१ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७.०१.२०११ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०६.२०११ |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमण गोविंदराव निडवदे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर
विभाग,जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग,जालना - श्री.व्ही. सी.पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अधीक्षक अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर)मंडळ,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी उपकार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग,जालना

(शाखा अभियंता) उपस्थित आहेत.  त्यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०६.०९.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दि. ०१.०१.२००७ ते ३१.०८.२००८ या कालावधीची कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्त.) विभाग जालना यांच्या कारचे लॉगबुक व प्रवास दैनंदिनीची झेरॉक्स प्रत मागितली आहे. कार्यकारी अभियंता यांच्या कारचे लॉगबुक व प्रवास दैनंदिनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना आजपर्यंत देता आली नाही. ही बाब अपिलार्थीस तात्काळ कळविणे आवश्यक होते. तसे केल्याचे दिसून येत नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी संबंधितांकडून लॉगबुकची झेरॉक्स व प्रवास दैनंदिनी मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे व माहिती अपिलार्थीस देण्याकरिता ते प्रयत्नशील होते.

वरील बाबीवरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, या विभागाचे प्रधान सचिव (जलसंधारण) यांनी या प्रकरणात व्यक्तिगत लक्ष घालून माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार मागितलेल्या माहितीच्या संदर्भात विहित मुदतीत कार्यवाही न झाल्याबाबत तसेच संबंधित अधिकारी यांची उपरोक्त कालावधीचे कारचे लॉगबुक व प्रवास दैनंदिनी कार्यालयात सादर केलेली नाही, असे सकृतदर्शनी दिसून आल्यामुळे यासंदर्भात यथोचित कार्यवाही करणे आवश्यक ठरत आहे. याकरिता राज्य माहिती आयोगास देण्यात आलेल्या अधिकारानुसार कलम २०(२) अन्वये विभागीय चौकशीची प्रक्रिया हाती घेण्याची शिफारस प्रधान सचिव (जलसंधारण) यांना करण्यात येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

प्रधान सचिव (जलसंधारण) यांना वर नमूद केल्याप्रमाणे विभागीय चौकशीची प्रक्रिया हाती घेण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक  ०५-०७-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.  श्री. सोमण गोविंदराव निडवदे, तुलसी निवास, चौंडा कॉम्प्लेक्सच्या मागे, शाहुपूरी

कॉलनी, राजीव गांधी चौक,लातूर-४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. प्रधान सचिव (जलसंधारण), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती विमल गणपत निला, : अपिलार्थी
रा.कबनसांगवी,ता.चाकूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना, उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी व महिला बाल कल्याण
अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती विमल गणपत निला | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,उदगीर, जि.लातूर - श्री. व्ही.एन.रंगवाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. थोरात पी.एस.,विस्तार अधिकारी (सां.),बालकल्याण विभाग,जि.प.लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी या त्यांच्या विभागामध्ये कार्यरत होत्या. कार्यरत असताना त्यांनी आमरण उपोषण केल्यामुळे त्यांना नोकरीतून कमी करण्यात आले. त्यांच्यावर पोलीस विभागाने कलम ३०९ चा खटला दाखल केला होता. सुनावणीच्या वेळी ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली. या प्रकरणातून निर्दोष सुटल्यानंतर त्यांच्या प्रकरणात जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीच्या तपशीलाच्या प्रती अपिलार्थी मागत आहेत. जन अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आली नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०२.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०२.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती विमल गणपत निला, रा. कबनसांगवी, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र श्रीधरराव कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.शेरा, ता.रेणापुर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,रेणापूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेंद्र श्रीधरराव कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर - श्री.पुट्टेवाड एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर - श्री.लोखंडे व्ही.जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन १९९० ते २००८ पर्यंतची मौ. शेरा येथे मिळालेला खासदार निधी, आमदार

निधी तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्याकडून मिळालेला निधी व या निधीतून झालेल्या विकास कामांची सविस्तर माहिती मागितली आहे. माहिती विस्तृत असल्यामुळे जन माहिती अधिकारी आतापर्यंत देऊ शकले नाहीत. आयोगाने यावर अपिलार्थीस सूचित केले की, त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे, त्यातील नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे त्याबाबत सांगावे म्हणजे जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे सहज शक्य होईल.यावर अपिलार्थी यांनी खालील कामाच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत.

१) मौ. शेरा येथील सभागृहाचे काम अपूर्ण आहे. त्या कामाच्या अंदाजपत्रकाची प्रत, कामावर झालेला खर्च इ.तपशील.

२) मौ. शेरा येथील नवीन झोनमधील कामांच्या अंदाजपत्रकाची प्रत व झालेल्या कामाचा तपशील

३) मौ. शेरा ग्रामपंचायतीअंतर्गत जुने पत्र्याचे शेड काढून त्याची विक्री केली आहे. ती विक्री करताना केलेल्या जाहीर लिलावाची नोटीस व जाहीरातीची प्रत व लिलाव विक्रीने प्राप्त झालेल्या रकमेचा तपशील.

वरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार देय होत आहे. प्रकरण जुने असल्याकारणाने त्याकडे गट विकास अधिकारी यांना व्यक्तिशः लक्ष घालावे लागेल व अपिलार्थीस विनामूल्य माहितीची प्रत नोंदणीकृत टपालाद्वारे जन माहिती अधिकारी पाठवतील असे पहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

४) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,रेणापूर,जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, अशी व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र श्रीधरराव कुलकणी, मु.पो.शेरा,ता.रेणापूर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालासाहेब गेना चव्हाण, : अपीलकर्ता
रा.शेरा, ता.रेणापूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालासाहेब गेना चव्हाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर - श्री.पुट्टेवाड एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर - श्री.लोखंडे व्ही.जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन १९९० ते २००८ पर्यंतची मौ. शेरा ग्रामपंचायतीसंदर्भात विविध मुद्यांद्वारे

मोठया प्रमाणात माहिती मागितली आहे. माहिती विस्तृत असल्यामुळे जन माहिती अधिकारी आतापर्यंत देऊ शकले नाही. आयोगाने यावर अपिलार्थीस सूचित केले की, त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्यातील नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे त्याबाबत सांगावे म्हणजे जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे सहज शक्य होईल.यावर अपिलार्थी यांनी खालील कामाच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत.

१) ग्रामपंचायतीअंतर्गत दर चार वर्षांनी फेरआकारणी होते. त्या फेर आकारणीमध्ये तयार झालेल्या कागदपत्रांच्या प्रती. सन २००४-०५ या कालावधीमध्ये झालेल्या फेरआकारणीनंतर तयार झालेल्या कागदपत्रांच्या प्रती.

२) गावातील शासकीय जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत आदर्श गाव तक्त्यामध्ये तसे नमूद केलेले असल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती.

उपरोक्त माहिती अपिलार्थीस देय होत आहे. प्रकरण जुने असल्याकारणाने विशेष बाब म्हणून जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांना ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती रेणापूर, जि.लातूर यांनी वर नमूद केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब गेना चव्हाण, मु.पो.शेरा, ता.रेणापूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप तु.गंगणे, : अपीलकर्ता
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जीवन रेखा प्रतिष्ठान द्वारा संचलित महिला
बी.सी.ए.महाविद्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी, :
जीवन रेखा प्रतिष्ठान द्वारा संचलित महिला
बी.सी.ए.महाविद्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रदिप तु.गंगणे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जीवन रेखा प्रतिष्ठान,लातूर तर्फे वकील ॲड.आशिष जाधवर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांच्या संस्थेचे वकील ॲड.आशिष जाधवर उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे ॲड. आशिष जाधवर यांनी आयोगास प्रकरणात पुढील तारीख देण्याची विनंती केली. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगापुढे असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत त्यांना माहिती देण्यात आली नाही व आज पुढील तारीख मागत आहेत, याची नोंद घ्यावी, अशी आयोगास विनंती केली. आयोगापुढे असलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित झाल्याचे दिसून येत नाही.

या प्रकरणामध्ये विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना आयोगातर्फे जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे. अतः जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण (अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप तु.गंगणे,पिंपळे बिल्डींग, हत्ते चौक, लातूर,ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी,जीवन रेखा प्रतिष्ठान, लातूर द्वारा संचलित महिला बी.सी.ए.महाविद्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह)या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माणिक देविदासराव अर्विकर, : अपीलकर्ता
रा. लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस निरीक्षक,
एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशन, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एस.आय.डी.सी.लातूर - श्री. प्रदीप शिवाजी काकडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस अधीक्षक, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १७.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माणिक देविदासराव अर्वीकर, देशपांडे गल्ली, लातूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एस.आय.डी.सी.,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय नारायण मातोळे,<br>रा.जयनगर, ता.औसा,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,<br>जयनगर, ता.औसा, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय नारायण मातोळे | : | उपस्थित |
| ३.२ | श्री.दगडू वैजीनाथ कार्ले, माजी अध्यक्ष, भारत निर्माण योजना व श्री. सहदेव मारुती चव्हाण, आजी अध्यक्ष, भारत निर्माण योजना | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत जयनगर,ता.औसा,जि.लातूर - श्री. एस.बी.यडकर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर - प्रतिनिधी - श्री.एन.बी.कुमठेकर, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व भारत निर्माण योजनेचे माजी व सध्याचे अध्यक्ष उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्याकडे भारत निर्माण योजनेअंतर्गत झालेली कामे,प्राप्त निधी व शिल्लक रक्कम यासंदर्भात माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १०.०८.२००९ रोजी सुनावणी घेतली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. ग्रामसेवक यांना जन माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी नियुक्त केले असल्यामुळे व संपूर्ण कागदपत्र ग्रामपंचायतीकडे असल्याकारणाने ग्रामसेवकाकडे माहितीचा अर्ज करावा, असा निर्णय घेतला आहे व अपील निकाली काढले आहे. याबाबत दि. २१.०८.२००९ रोजी सुध्दा गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्याकडे माहितीचा अर्ज करणे उचित ठरत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाच्या स्तरावर अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय नारायण मातोळे,रा. जयनगर, ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत जयनगर,ता.औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका पुरवठा अधिकारी,<br>तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनंत गोविंदराव पारसेवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर,जि.लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०३.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला.

त्यांनी मागितलेल्या माहितीची एकूण ४००० पृष्ठे तयार झाली व त्याच्या झेरॉक्स प्रती दि. २०.११.२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्यावेळी मान्य केली. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे आदेश आयोगातर्फे देण्यात यावेत, अशी आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये विनंती केली. आयोगाने जन माहिती अधिकारी यांना भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती देण्यात येईल, यासाठी दक्ष राहण्याबाबत सूचित केले.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे तथापि जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती देण्यात येईल, यासाठी दक्ष राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,गोविंदराज प्रिंटींग प्रेस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मलंग अब्दुल रहमान पि.मो.इस्माईल,<br>रा.दबीरपुरा,उदगीर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय,रोडगी, ता.हदगाव,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,पंचायत समिती,हदगाव,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रोडगी, ता.हदगाव, जि.नांदेड - श्री.पांडुरंग रमेशराव श्रीरामवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड - प्रतिनिधी - श्री. विजय यादवराव खाजेकर, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन १९६२ सालची त्रयस्थ श्री.

सोनाजी बाबाराव काकडे (चौकीदार), उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.१ नांदेड यांच्या जन्मतारखेबाबत पुराव्याच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. सदरच्या माहितीचा शोध घेऊनही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. ही बाब अपिलार्थीस यापूर्वी कळविण्यात आली आहे. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील दुसरा मुद्दा हा आहे की, जातीची नोंद ज्या कागदपत्राच्या आधारे घेण्यात आली, त्या कागदपत्रांच्या प्रती आवश्यक आहेत.सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असत नाही, म्हणून देता आली नाही.

या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हदगाव,जि.नांदेड यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून न आल्यामुळे प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, असे आयोगाने सूचित केले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ही बाब मान्य केली.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान पि.मो.इस्माईल, रा.दबीरपुरा,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रोडगी, ता.हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपीलकर्ता
रा.सताळा (खुर्द), ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि सहसंचालक,
विभागीय कृषि सहसंचालनालय,म.रा.लातूर विभाग,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय कृषि सहसंचालक, विभागीय कृषि
सहसंचालनालय, लातूर विभाग,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर यांचे वकील ॲड.एस.ए.वाकुरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय,लातूर विभाग,लातूर- श्री. एम.के.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय,लातूर विभाग, लातूर - श्री. एस.एम.जमदाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी तर्फे वकील ॲड.एस.ए.वाकुरे,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस यापूर्वी देण्यात आली आहे. ही बाब अपिलार्थीच्या वकिलांनी मान्य केली. तथापि त्यांना चुकीची व विसंगत माहिती दिल्याचे आयोगास सांगितले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भाने श्री. डी.एल.जाधव,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, एस.डी.भारती,पी.जी.आकणगिरे, कृषि अधिकारी, श्री. पी.एम.भुजबळ, श्री. एस.एम.तोटावार कृषि पर्यवेक्षक यांच्या संदर्भात दोन वेळा वेगवेगळी माहिती दिली आहे. त्यातील नेमकी खरी कोणती ती देण्यात यावी.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.ही माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, असे सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. त्यामुळे वरील माहिती या दोनही कार्यालयाच्या प्रमुखांना अभिलेखाची पाहणी करुन त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय,लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर तसेच कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडील अपिलार्थीस देय होत असलेली माहिती एकत्रित करुन नोंदणीकृत टपालाद्वारे आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु.पो.सताळा, ता.अहमदपूर,जि.लातूर - ४१३ ५२३.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विठ्ठल निवृत्तीराव जाधव,<br>रा.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०३.२००९ (फेरसादर दि.०५.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास

आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल निवृत्तीराव जाधव,वृंदावन, अश्वमेघ हॉटेलच्या पाठीमागे, श्रीकृष्ण मंदिरजवळ,श्रीनगर,लातूर.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बोधले गणेश शिवाजीराव,<br>रा.औसा,जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपकोषागार अधिकारी,उपकोषागार अधिकारी<br>कार्यालय,औसा,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपकोषागार अधिकारी,उपकोषागार अधिकारी<br>कार्यालय,औसा,जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कोषागार अधिकारी, लातूर - श्री.व्ही. व्ही.जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर कोषागार अधिकारी, लातूर - श्री. टी. डब्ल्यु. सरोदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपील अर्जावरुन अपिलार्थी हे आय.टी.आय.औसा मध्ये निदेशक या पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सन २००९-१० या कालावधीत महाराष्ट्र दर्शन प्रवास सवलत घेतलेल्या कर्मचाऱ्यांचे मंजूरी आदेश,एस.टी.तिकीट व पुराव्याची दुय्यम प्रत -अशी माहिती मागितली आहे. प्रस्तुत बिले पास केल्यानंतर ती महाराष्ट्र कोषागार, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात येतात व दुय्यम प्रत त्यांच्या कार्यालयात ठेवण्यात येत नाही ही बाब दि. १२.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आली आहे. तथापि या बिलांची मूळ प्रत संबंधित कार्यालय म्हणजे प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,औसा यांच्याकडे उपलब्ध असते. त्यानुसार त्यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी, असेही अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अशाप्रकारची बीले पास करताना अवलंबविण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीबाबत अपिलार्थीस कळविलेले आहे.

वरील बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, निदेशक,आय.टी.आय.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कोषागार अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागरगोजे बळीराम सोपान, : अपीलकर्ता
रा.रामवाडी, ता.चाकूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,चाकूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,चाकूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागरगोजे बळीराम सोपान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर - श्री.ए.व्ही.सैदानी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, चाकूर, जि.लातूर - श्री. व्ही. एस.देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००२ ते डिसेंबर, २००८ पर्यंतची चाकूर तालुक्यातील रोहयोअंतर्गत स्वस्त धान्य उचल

व वाटपाबाबत गावनिहाय यंत्रणानिहाय माहिती मागितली आहे. ही माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीने या माहितीची पाहणी करावी असे दि. १५.०२.२००९ रोजी कळविण्यात आले आहे.अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली. तथापि त्यांनी अशी पाहणी केलेली नाही.अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे, ही बाब आयोगास दिसून आली. यावर आयोगाने सूचित केल्यानुसार अपिलार्थी यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करुन दोन दुकानाची माहिती देण्यात यावी, असे सांगितले. या दुकानदारांनी उचललेल्या मालाची व लाभधारकांना वितरण केलेल्या कुपनची नोंद घेतलेल्या रजिस्टरची व कुपनच्या झेरॉक्स प्रती, ही माहिती सन २००२ ते २००८ या कालावधीची देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागितलेली सदरची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार दोन दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी होईल असे जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,चाकूर, जि.लातूर यांना पहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,चाकूर,जि.लातूर यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागरगोजे बळीराम सोपान,रा.रामवाडी,पो.महाळंगी, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. इनायत खान पिता रहीम खान पठाण,<br>रा.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता,श्रेणी-१, सा.बां.उपविभाग क्र.१,लातूर - श्री. संतोष विजयकृष्ण कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, लातूर - श्री. राजेंद्र सावळेराम शहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २२.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १३.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २८.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २२.०६.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९.०७.२००९ (फेरसादर,दि.३०.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या दि. २२.०१.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात आलेला नाही. ही बाब विचारात घेता,या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२८.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इनायतखॉन रहीमखॉन पठाण, रा. अंबाजोगाईरोड,पठाणनगर,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरेशी अब्दुल रशीद पि. शेख चांद,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, अजमत मजीद गुलशन-ए-अतफाल ऊर्दू प्राथमिक प्रशाला, उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापिका, अजमत मजीद गुलशन-ए-अतफाल ऊर्दू प्राथमिक प्रशाला, उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,लातूर -प्रतिनिधी श्री. प्रवीण गायकवाड,अधीक्षक वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२००९ (फेरसादर,दि. ०९.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून प्रकरणाची सद्यस्थिती अवगत करुन घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरेशी अब्दुल रशीद पि.शेख चान्द,रा.मोहल्ला पंचकी, भाजीमंडीजवळ,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अजमत मजीद गुलशन-ए-अतफाल ऊर्दू प्राथमिक प्रशाला, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. साळुंके नारायण किशनराव,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>श्यामलाल मेमोरियल हायस्कूल, उदगीर,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, श्यामलाल मेमोरियल एज्युकेशन सोसायटी,<br>उदगीर, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. साळुंके नारायण किशनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,श्यामलाल मेमोरियल हायस्कूल, उदगीर,जि.लातूर- श्री. अहमदाबादे भाऊराव भिमराव | : | उपस्थित |
| ३.३ | सचिव,शामलाल मेमोरियल एज्यूकेशन सोसायटी,उदगीर - प्रतिनिधी- श्री. माधव खताळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २८.०८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २३.०९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख — दि. फेरसादर,दि.०९.१२.२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. शामलाल मेमोरियल एज्युकेशन सोसायटी,उदगीर या संस्थेचे प्रतिनिधी श्री. माधव खताळ उपस्थित आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रकरण (अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२३.०९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साळुंके नारायण किशनराव, द्वारा हुलसुरे निवास, संत कबीर नगर, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्यामलाल मेमोरियल हायस्कूल, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना

(अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. जोगदंड सागर चंद्रकांत, : अपीलकर्ता
रा.रेणापूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,रेणापूर,
जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,रेणापूर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - सौ. जोगदंड सागर चंद्रकांत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,रेणापूर, जि.लातूर - श्री. माने एन.पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती,रेणापूर, जि.लातूर - श्री. लोखंडे व्ही.जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर,जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे. मुद्दा क्र. २ मधील शेतरस्त्याबाबतची माहिती दि. १२.११.२००९ रोजी कळविण्यात आली आहे. तसेच अपिलार्थी यांनी सन २००७-०९ या कालावधीच्या मासिक बैठकीच्या इतिवृत्तांताच्या नकला मागितल्या आहेत. त्यावेळी ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही.आज रोजी सुनावणीच्या वेळी मासिक सभेच्या बैठकीच्या इतिवृत्तांताच्या प्रती (एकूण १३३ पृष्ठे) सोबत आणलेल्या आहेत. आयोगाने सूचित केल्याप्रमाणे माहितीचा एक संच अपिलार्थीस देण्यात आला आहे. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी व या माहितीमध्ये काही माहिती अपूर्ण आढळून आल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाल्याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांना चौकशी करुन यथोचित कार्यवाही करावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

५) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास त्यासंदर्भातील माहिती पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

६) या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाल्याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी चौकशी करुन यथोचित कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. जोगदंड सागर चंद्रकांत, रा.ढोरगल्ली, ता.रेणापूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,रेणापूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,रेणापूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सिध्दलिंगप्पा चनबसप्पा राजोळे, | : | अपीलकर्ता |
| रा.लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कर अधीक्षक, नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कर अधीक्षक, नगर परिषद,लातूर - श्री .मुतंगे ओ.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या

माहितीच्या संदर्भात दि. २४.१०.२००९ रोजी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ०६.०७.२००९ रोजी विनामूल्य माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेतला. त्यानुसार अपिलार्थीस दि. १०.०७.२००९ रोजी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या संदर्भात पुन्हा कळविण्यात आले. तसेच अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे व अपिलात झालेल्या चर्चेप्रमाणे शंकरअप्पा नागशेट्टीअप्पा मंटाळे यांच्या मालकीच्या मालमत्ता क्र. आर-७/१४१३ या मालमत्तेबाबतच्या ८-अ चा उतारा अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी याबाबत दि. १६.०७.२००९ रोजी पोच दिलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या द्वितीय अपिलामध्ये त्यांना माहिती चुकीची दिल्याचे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. तथापि आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दलिंगप्पा चनबसप्पा राजोळे,रा.मंठाळेनगर,प्लॉट नं.२५,सर्वे नं.१४८, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रघुनाथ बनसोडे, : अपीलकर्ता
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपायुक्त (सा.प्र.वि.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद,लातूर - प्रतिनिधी - श्री. सतिश शिवणे,नगर रचनाकार, नगर परिषद,लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (सा.प्र.वि.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. प्रविण मेंगशेट्टी, तहसीलदार,नगर पालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०१.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२००८ (फेरसादर दि. |

०४.०९.२००८)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २६.०९.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे सन २००० ते २००७ या कालावधीतील अभियंत्यांच्या नेमणूकीबाबतची माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली आहे. या माहितीच्या संदर्भात दि. १८.१०.२००७ रोजी अपिलार्थीस कळविण्यात येऊन प्रतिसाद दिला आहे. या संदर्भात अपिलार्थीने माहिती अपूर्ण आहे, असे कळविल्यानंतर दि. ०३.१२.२००७ रोजी पुन्हा माहिती देण्यात आली. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त यांनी सुनावणी घेतली. दि. ३१.१२.२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीनंतर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील संदर्भित कर्मचाऱ्याचे वेतनाबाबत नगर पालिकेमार्फत पगार पत्रकाची प्रत व सदरील कर्मचाऱ्यावर किती खर्च झाला, याबाबतची व सदरील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीबाबत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी जिल्हाधिकारी व नगर परिषद संचालनालय,मुंबई यांच्याशी पत्रव्यवहार केला असल्यास त्या पत्रव्यवहाराची प्रत अपिलार्थीस द्यावी, असा निर्णय दिला आहे. त्यानुसार दि. १०.०१.२००८ रोजी एकूण १२० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांना ही माहिती प्राप्त झाली आहे. त्याची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. रघुनाथ बनसोडे, नगरसेवक, नाथनगर,लातूर

२.	जन माहिती अधिकारी तथा  मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.वि.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले,<br>रा.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (सा.प्र.वि.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद,लातूर - प्रतिनिधी - श्री. सतिश शिवणे,नगर रचनाकार, नगर परिषद,लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (सा.प्र.वि.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. प्रविण मेंगशेट्टी, तहसीलदार,नगर पालिका प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.०८.२००६ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००६ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचे विचाराधीन द्वितीय अपील हे अपिलार्थीच्या दि. ०३.०७.२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर आधारित आहे. या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे अ.भा.वि.प.विवेकानंद संस्कार संस्थेच्या लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड,लातूर येथील प्लॉट क्र. ३ व ६ येथील बांधकामाबाबत एकूण सतरा मुद्यांवर माहिती मागितली आहे. याच मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र अपिले सादर केलेले आहेत. या दोन अपिलांपैकी एका अपिलासंदर्भात आयोगाने यापूर्वीच दि. २६.०२.२००७ रोजी सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन सदर बाब दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणात पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय देण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही. यास्तव प्रस्तुत द्वितीय अपील निष्प्रभ ठरत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले, 'साधना', लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दयानंद बाबूराव कुंभार, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दयानंद बाबूराव कुंभार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत साकोळ,ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर - श्री.धाकडे अंकूश देवराव | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर - श्री. नितीन शेषेराव दाताळ | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. स्वामी दयानंद नागनाथ, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०८.२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३.०१.२००९

(फेरसादर दि.०७.०१.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी यांनी साकोळ, ग्रामपंचायतीमधील नोंदणी फेरफार बुकाच्या सन १९६६ ते दि.०६.०३.२००९ पर्यंतच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. ती माहिती अद्याप त्यांना देता आलेली नाही. पुढे त्यांनी असेही अवगत केले की, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ खालील मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक नियम १९५९ अन्वये अभिलेख्यांचे विविध १ ते २८ नमुने निश्चित केले आहे. त्यामध्ये अशाप्रकारच्या फेरफार बुकची नोंद केलेली नाही. त्यामुळे असे रजिस्टर ठेवणे बंधनकारक नाही व असे रजिस्टर उपलब्ध नाही. म्हणून अपिलार्थीस दि. ०२.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अशाप्रकारचे फेरफार हे महत्त्वाचे असल्याकारणाने कोणत्यातरी स्वरुपात त्यांच्या कार्यालयातील इतर रजिस्टरमध्ये याची नोंद असलीच पाहिजे, याबाबत आयोगाने पृच्छा केली असता आयोगास अवगत करण्यात आले की, नमुना नं. ८ च्या रजिस्टर मधील 'शेरा' या रकान्यामध्ये या माहितीची नोंद करण्यात येत असते. त्यामुळे अपिलार्थीने जे रजिस्टर मागितले आहे, ते हेच रजिस्टर समजण्यात यावे, असा आयोगातर्फे निष्कर्ष काढण्यात आला.अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अपिलार्थी यांनी एकंदर ४४ वर्षांची साकोळ ग्रामपंचायतीमधील सर्व मालमत्तेच्या फेरफाराची माहिती मागितली आहे. ही बाब आयोगास व्यवहार्य वाटत नाही. त्यामुळे त्यांना, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार शासकीय कार्यालयाच्या साधनसामग्री व मनुष्यबळावर विपरीत ताण पडणार नाही, अशी नेमकी माहिती मागणे आवश्यक आहे. अन्यथा माहितीचा अर्ज निष्प्रभ ठरु शकतो. प्रसंगी केंद्रीय माहिती आयोगाने अशाप्रकारच्या अर्जांवर माहिती देणे शक्य नाही, असे निर्णय घेतले आहेत. याकरिता आयोगाने अपिलार्थीस मागणी केलेल्या माहितीचे व्याप्ती कमी करुन नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे, हे स्वेच्छेने सांगण्याचे सूचित केले. यावर अपिलार्थी यांनी त्यांना खालील माहिती आवश्यक आहे, असे सांगितले.

" संग्राम वैजनाथ कुंभार यांच्या नावे असलेली जागा बसवंत वैजनाथ कुंभार यांच्या नावे केलेल्या फेरफार रजिस्टरची प्रत."

यावर आयोगाचे असे मत आहे की, जन माहिती अधिकारी यांना ही माहिती उपलब्ध असलेल्या रजिस्टरची पाहणी करण्यासाठी अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. यामध्ये प्रशासकीय अडचणी उपस्थित होऊ नयेत, याकडे गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांना व्यक्तिशः लक्ष पुरवावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेल्या रजिस्टरची पाहणी करण्यासाठी अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी. त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुंभार दयानंद बाबुराव,एम.आय.डी.सी.समोर जोशी निवास,निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत साकोळ, ता. शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३८ | | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. | ०६-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २७.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०७.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३९ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/अ.प./१४०२ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७.०१.२०११ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०६.२०११ |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
आगार प्रमुख (क),राज्य परिवहन
महामंडळ,उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर - श्री.शिवाजी प्रल्हादराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर-प्रतिनिधी- श्री. दयानंद मसाजी गायकवाड, विभागीय वाहतूक अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री.के.ए.शेख, श्री.एम.पी.मरे, श्री.ए.एम.शिंदे, श्री.एन.एम.बिरादार,श्री.ए.के.डोळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २८.८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०.११.२००९ (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त)<br>दि.०२.०१.२०१० (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष (९ पैकी ५) उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादात अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २५.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००१ ते ०७ या विस्तृत कालावधीत उदगीर राज्य परिवहन आगार, उदगीर,जि.लातूर संदर्भात पंधरा मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती इतर ९ त्रयस्थ वाहनचालक व वाहकांच्या संदर्भातील आहे. अपिलार्थी यांनी अशाप्रकारची मोठया कालावधीची व विस्तृत माहिती मागितल्याने ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. तदनंतर दि.०९.०९.२००९ रोजी संपूर्ण माहिती (एकूण १०१ पृष्ठांची) अपिलार्थीस देण्यात आली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या दि. १८.११.२००९ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे. तथापि या माहितीमध्ये काही मुद्यांची माहिती अपूरी व खोटी आहे, असे मोघम नमूद केले आहे. नेमकी खोटी व अपुरी माहिती कोणती, हे अपिलार्थी यांनी नमूद केलेले नाही.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०७-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिवगण निवास, सत्ताने निवाससमोर,बिदर रोड,मु.पो.ता.उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गायकवाड बंकट गंगाधर,<br>रा.उदगीर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.लातूर - प्रतिनिधी - श्री.दयानंद नागनाथ स्वामी,अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.५ | श्री. जाधव जे.के.मुख्याध्यापक, सानेगुरुजी विद्यालय, उदगीर, जि.लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. विभागीय शिक्षण उपसंचालक हे शिक्षण विभागातील विभागीय स्तरावरील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. यासतव या प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर यांना जन अपिलीय अधिकारी निश्चित करण्यात येत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांच्याकडे प्रकरण (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह)पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०३.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गायकवाड बंकट गंगाधर, पंचायत समितीच्या गोदामाजवळ,अशोकनगर, उदगीर,ता.उदगीर,जि.लातूर - ४१३ ५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बालाजी विश्वनाथ बिरादार,<br>रा.चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,पंचायत समिती, देवणी, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालाजी विश्वनाथ बिरादार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर - श्री. आर.आर.बिराजदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर - श्री. दाताळ नितीन शेषराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २१.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष जालनाथबाबा मठाच्या जागेसंदर्भात नमुना नं. ८ ची प्रत व इतर दोन मुद्यांद्वारे प्रश्नार्थक स्वरुपामध्ये खुलासेवजा व स्पष्टीकरणात्मक माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत सदरची बाब मोडत नाही. त्यामुळे माहिती देय होत नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर यांनी अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांना कोणती माहिती अभिप्रेत आहे, हे विचारात घेऊन दि. २७.०१.२०१० रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. तथापि त्यांना माहिती उशिरा मिळाली आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले.

अपिलार्थी यांचा अर्ज प्रश्नार्थक स्वरुपाचा आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती उशिरा मिळाली, ही बाब विचारात घेणे आयोगास आवश्यक वाटत नाही.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी विश्वनाथ बिरादार,रा.मौजे चवणहिप्परगा,ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. देविदास रामराव गायकवाड,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देविदास रामराव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन, गौण खनिज/भ्रनिस/तक्रार,जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर - श्री. एस.आर.सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - धान्य खरेदी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या स्वतःच्या जमिनीबाबत एकूण सहा मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब युक्तिवादात सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. तथापि त्यांना मुद्दा क्र. ४,५,६ या मुद्यावरील माहिती मिळाली आहे. परंतु मुद्दा क्र. १,२,३ ची माहिती मिळाली नाही, असे युक्तिवादात सांगितले. जन माहिती अधिकारी मुद्दा क्र. १,२,व ३ ची माहिती अपिलार्थीस दिल्याच्या समर्थनार्थ पुरावा सादर करु शकले नाहीत. यास्तव सदरची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल. निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांना ही बाब विशेष बाब म्हणून पहावी लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांनी एक विशेष बाब म्हणून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ३ ची माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, असे व्यक्तिशः पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड,"श्री मावूली", दत्त मंदिरमागे, ड्रायव्हर कॉलनी, जूना औसा रोड,लातूर - ४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, गौणखनिज/भ्रनिस/तक्रार,जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धान्य खरेदी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. झेरकुंटे विरभद्र लिंगप्पा, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, संगायो विभाग, तहसील
कार्यालय,उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर ,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (संगायो) विभाग,उदगीर,जि.लातूर -सौ. सी.एच.लोभे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो) विभाग,उदगीर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये राष्ट्रीय

सामाजिक अर्थसहाय्य योजने अंतर्गत लाभार्थींना वाटप केलेल्या अनुदानासंदर्भात सन २००३-०४, २००४-०५, २००५-६ पर्यंतच्या मूळ संचिका मागितल्या आहेत. सदरच्या संचिका शोधून माहिती देण्यात येईल, असे दि. ०८.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही सांगितले की, एकूण १८० संचिका उपलब्ध असून त्या संचिकांच्या झेरॉक्स प्रती कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाव्यात, असे दि. ०७.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार एकूण १८० संचिकांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी दि. ११.१२.२००९ रोजी माहिती घेऊन पोच दिलेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. झेरकुंटे विरभद्र लिंगप्पा,समतानगर,डॅम रोड, विठ्ठल मंदिराजवळ,उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो) विभाग,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिंदे बालाजी निवृत्ती, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदपूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम,अहमदपूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (इमारती),उस्मानाबाद - श्री. मठपती विजयकुमार गंगाधर | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (इमारती),उस्मानाबाद - श्री. व्ही.एस.करंदे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर - श्री. राजेंद्र सावळेराम राहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (सध्याचे व तत्कालीन) व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन व युक्तिवादावरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी निवृत्ती शिंदे,रा.साठेनगर,अहमदपूर, ता.अहमदपूर,जि.लातूर-४१३ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (इमारती),उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हळीघोंगडे अविनाश गुरप्पा,<br>रा.वाढवणा (बु.),ता.उदगीर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री.शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.), ता.उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य,शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.),ता.उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर - प्रतिनिधी - श्री. अरगर एस.एच.,शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.),ता.उदगीर,जि.लातूर या शाळेबाबत एकूण ७ मुद्यावर विविध माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांच्या दि. ०८.०१.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली आहे. तथापि द्वितीय अपिलाची कारणे या सदरामध्ये त्यांना अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राचार्य, श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, वाढवणा(बु.), ता.उदगीर जिल्हा लातूर यांच्याकडून त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. यास्तव द्वितीय अपील प्रकरण निकाली काढण्यात यावे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हळीघोंगडे अविनाश गुरप्पा,रा.वाढवणा (बु.),ता.उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.),ता.उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवराज बापुराव शेटकर, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक, नगर परिषद,अहमदपूर, जि.लातूर -श्री. बिलापट्टे एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.

१२.०८.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. यामध्ये एकूण ७२ + ५९ = १३१ पृष्ठे देण्यात आली आहेत. यासाठी अपिलार्थी यांनी ₹२६६/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केलेला आहे. अपिलार्थी यांनी चुकीची व असमाधानकारक माहिती मिळाली आहे असे कारण दर्शवून मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.११.२००९ रोजीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. १०.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे योग्यप्रकारे माहिती दिलेली आहे. अर्जदाराने त्यांच्या वडिलांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची मागणी केलेली होती. परंतु अर्जदाराच्या भावाच्या नावे नोंद झालेली कागदपत्रे दिली आहेत. श्री. बापुराव गुरुबसअप्पा शेटकर यांच्या नावाची नोंद रिव्हीजन नुसार झाल्यामुळे त्यांचे नावे नोंद करण्यासाठी कोणतेही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाहीत.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवराज बापूराव शेटकार,घर नं.ई-२९६,बस्वेश्वर चौक, कॉलेज रोड, अहमदपूर, जि.लातूर-४१३५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद,अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कोनाले शंकरअप्पा रामचंद्र,<br>रा.सावरगाव थोट, ता.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सावरगाव (थोट),ता.अहमदपूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सावरगाव(थोट),ता.अहमदपूर,जि.लातूर - श्री. वलांडे सी.व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर - श्री.बोंबले पी.व्ही. | : | उपस्थित |
| ३.४ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर - श्री.बिराजदार ए.एन. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३.०१.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, सध्याचे व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली माहिती प्रथम दि. ३०.१२.२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती उशिरा मिळाली म्हणून प्रथम अपील दाखल केले. यावर विस्तार अधिकारी (पं.) यांनी दि. १४.०१.२०१० रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी संदर्भित कामाचे मूल्यांकन झालेले नव्हते. त्यामुळे माहिती देता आली नाही. त्यानंतर मूल्यांकन झाल्याबरोबर यासंदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. २१.०१.२०१० रोजी विनामूल्य माहिती देण्यात आली. आयोगापुढे अपिलार्थीचे दि. २९.०६.२०११ रोजीचे पत्र आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, दि. ०९.१०.२००९ अन्वये मागविण्यात आलेली संपूर्ण माहिती मिळालेली आहे. याकरिता प्रस्तुत द्वितीय अपील मागे घेण्याची विनंती आयोगास केली आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कोनाले शंकरअप्पा रामचंद्र,रा.सावरगाव (थोट), ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव(थोट), ता. अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेंद्र शिवशंकरप्पा चिंचनसुरे, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत
कार्यालय,कासारशिरसी, ता.निलंगा,जि. लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,ता.निलंगा,जि.
लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,कासारशिरसी, ता.निलंगा,जि. लातूर - श्री. कामीटे गुलाब नारायण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती,निलंगा,जि. लातूर- डॉ.उदय आप्पासाहेब पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे कासारशिरसी ग्रामपंचायत अंतर्गत काही भूखंडाच्या नमुना नं. ८ ची माहिती मागितली आहे. ही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस देण्यात आलेली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे, असे सांगितले. तथापि ते त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पुरावा सादर करु शकले नाहीत, म्हणून चार दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. यानंतरही तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत माहिती देण्यात आलेली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक सध्या निलंबित असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.

सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांना द्यावयाची माहिती उपलब्ध असून त्यांनी ती आज सुनावणीच्या वेळी आयोगापुढे सादर केली. तथापि अपिलार्थी अनुपस्थित आहेत. याकरिता आयोगाचे निर्देश असे आहेत की, सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यावर त्यांनी माहितीची पाहणी करावी. त्यामध्ये काही माहिती अपूर्ण आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांना कळवावे लागेल. पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित देय होत असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याचे आत विनामूल्य पाठवावी व त्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेंद्र शिवशंकरप्पा चिंचनसुरे, शासकीय संक्रमण निवासस्थान (बी ॲण्ड सी)टाईप-१,रुम नं.५ जुना औसारोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कासारशिरसी, ता.निलंगा,जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,निलंगा,जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर (पिंटु) विश्वनाथ धडे,<br>रा.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>धर्मादाय आयुक्त कार्यालय,लातूर विभाग,<br>लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>धर्मादाय आयुक्त कार्यालय, लातूर विभाग,<br>लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर (पिंटु) विश्वनाथ धडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अधीक्षक, धर्मादाय उपआयुक्त कार्यालय,लातूर- श्री. क्षीरसागर नारायणराव शंकरराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - धर्मादाय उपआयुक्त, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.१०.२०९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १२.०८.२००९ रोजीच्या अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"अहमदपूर शहरामध्ये हिंदू धार्मीक मंदिर किती व ट्रस्ट रजिस्ट्रर नोंद किती व त्या मंदिरांची नांवे काय व त्यांच्या ट्रस्ट मेंबरांचे नावे काय व हयाची रजिस्ट्री नोंद कधी करण्यात आली. व मंदिराचे ठिकाण व पत्ता त्या ट्रस्टचे अटी व नियम काय,

त्याच्या किती अंतरात दारु दुकान,कत्तल खाना, मठाण मार्केट व खानावळ,किती अंतरात असले पाहिजे यांची सर्व माहिती मराठी भाषांतरात देण्यात यावी,ही विनंती "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांना समक्ष सांगण्यात आले होते की,न्यासाचे नंबर देण्यात यावेत म्हणजे न्यासाची माहिती देण्यात येईल. तथापि त्यांनी तशी माहिती दिली नाही. सदरील माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्यामुळे रेकॉर्ड पाहणेसाठी निरीक्षणाचा अर्ज दिला असता तर कार्यालयाच्या अभिलेखाचे निरीक्षण देऊन माहिती देता आली असती. त्याचप्रमाणे मंदिरापासून किती अंतरावर दारु दुकाने,कत्तलखाना,मटण मार्केट व खानावळ असले पाहिजेत याची माहिती त्यांच्याकडे नसते म्हणून देता येत नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांचे आज सुनावणीच्या वेळी तोंडी काहीही म्हणणे नाही. गुणवत्तेच्या आधारे निर्णय द्यावा. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहिले असता असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांचा प्रथम अपील अर्ज कलम १९(१) नुसार विहित मुदतीत सादर न केल्यामुळे मुदतबाहय ठरवून अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील फेटाळले आहे. तसेच अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी अहमदपूर शहरामधील सर्व हिंदू धार्मिक मंदिरे व ट्रस्टची माहिती मागितली आहे.अशी मंदिरे व ट्रस्ट अहमदपूर शहरामध्ये अंदाजे ६० ते ७० इतकी असू शकतात असे सुनावणीच्यावेळी आयोगास आढळून आले. या सर्व बाबी विचारात घेता व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले असले तरी ही बाब बाजूला ठेवून खालील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) अन्वये देय होत आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

"अहमदपूर शहरामध्ये नोंदणी झालेल्या एकूण मंदिरांची संख्या. त्या मंदिरांची नावे, नोंदणी क्रमांक व दिनांक, मंदिराचे ठिकाण व पत्ता." इतर माहिती अपिलार्थीस उपलब्ध होऊ शकत नाही.अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली.

सदरची माहिती एक विशेष बाब म्हणून जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,लातूर यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या संपूर्ण जिल्हयातील एकत्रित माहितीमधून काढून नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील त्यांना देय होत असलेली वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर (पिंटू) विश्वनाथ धडे,हमणे गल्ली, अहमदपूर,ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय उपआयुक्त कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. काळे बालाजी रावसाहेब, : अपिलार्थी
रा.निटुर, ता.निलंगा,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग निलंगा,जि. लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी वैजनाथ,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, लातूर लघुपाटबंधारे विभाग, लातूर - श्री. द.व्यं. हंद्राळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी (वै),जि.बीड- श्री. ब.शं.स्वामी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २१.०९.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये ताजपुर पाझर तलावाअंतर्गत सर्वे नं. ६७/२ व ६७/३ मध्ये झालेल्या अतिक्रमणाबाबतची माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली आहे. या माहितीकरिता ₹१५/- इतके शुल्क भरणा करण्याकरिता दि. ३१.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले. अपिलार्थीने शुल्काचा भरणा दि. ०७.११.२००९ रोजी केल्यानंतर मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे, असे नमूद करुन अपिलार्थीने प्रथम अपील सादर केले. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी (वै),जि.बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी घेतली आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, त्यांना देय होत असलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिलेली माहिती इत्यादीचा सांगोपांग विचार करुन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महंमद अब्दुल रजाक अ.रहीमान, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महंमद अब्दुल रजाक अ.रहीमान व त्यांचे वकील ॲड. एस.ए.पी.कादरी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था,लातूर - प्रतिनिधी - श्री. बी.बी.चव्हाण, सहायक सहकार अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,लातूर. | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. ते

माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील सद्यस्थिती आयोगास अवगत करु शकले नाहीत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महंमद अब्दुल रजाक अ.रहीमान, माजी सचिव,युगंधर गृह निर्माण सोसायटी, म.अर्वी, रा.लेबर कॉलनी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मल्लिकार्जुन श्रीरंग पाटील, : अपिलार्थी
रा.उजनी, ता.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, श्री गणेश
विद्यालय,उजनी,ता.औसा,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, श्री गणेश विद्यालय,उजनी,ता.औसा,जि.लातूर - श्री. वाघमारे बी.एम. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. फड आर.बी.,व.स. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री.सोपान धोंडीबा कागे यांच्या पदाच्या मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत मागितली आहे. अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी सदरचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांच्याकडे पाठविण्यात आला नव्हता. त्यामुळे माहिती निरंक होती. ही बाब अपिलार्थीस समक्ष सांगितली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी शिक्षकांची मार्च,एप्रिल व जुलै,२००९ या महिन्यांच्या हजेरीपटाच्या प्रती मागितल्या आहेत. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली असल्याने त्यांना वेळोवेळी संपर्क साधून माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगास दाखविण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज तयार आहे व अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः मागितली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गणेश विद्यालय,उजनी,ता.औसा,जि.लातूर यांना एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्यासाठी नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल. अपिलार्थी उपस्थित झाल्यास अपिलार्थीस माहितीच्या प्रती हस्तांतरित कराव्या लागतील.

प्रसंगावशात्, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने अशाचप्रकारे एका महिला कर्मचाऱ्यासंदर्भात माहितीसाठीच्या अर्जाद्वारे माहिती मागितली आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला असून अपिलार्थीने त्यास प्रतिसाद दिलेला नाही.

अतः आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मल्लिकार्जुन श्रीरंग पाटील, मु.पो.उजनी,ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गणेश विद्यालय, उजनी, ता. औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कारनाळे नारायण नागनाथ,<br>रा.उजना, ता.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय समाजकल्याण कार्यालय,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा, तुळशीरामतांडा,ता.अहमदपूर,जि.लातूर - श्री. जाधव एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर - श्री. एल.आय.वाघमारे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग,लातूर - प्रतिनिधी - श्री. अरवत बी.जी., समाजकल्याण अधिकारी,गट-ब | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १२.११.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जून, ९९ ते दि.१२ नोव्हेंबर, २००९ अशी दहा वर्षांची मोठया कालावधीची एकूण १६ मुद्यांवर सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा, तुळशीरामतांडा, ता. अहमदपूर, जि. लातूर या एकाच शाळेची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी हे त्यांच्याच शाळेचे माजी कर्मचारी होते व त्यांचे अशाच प्रकारचे एकूण १० ते १२ अर्ज माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त झालेले आहेत व प्रत्येक अर्जामध्ये जवळजवळ एकसारखीच माहिती मागविली आहे. विचाराधीन प्रकरणासंदर्भातील माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती फार मोठ्या प्रमाणात विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे एक महिन्याच्या आत एकत्रित करुन देणे शक्य होत नाही. माहिती एकत्रित करुन घेतल्यानंतर दि. १५.०१.२०१० रोजी अपिलार्थीस व्यक्तिश: देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांच्या दि. ०१.०२.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळालेली आहे, असे दिसून येत आहे परंतु त्यांना माहिती अपूर्ण, अर्धवट व खोटी देण्यात आली, असे मोघमपणे लिहिलेले आहे व नेमकेपणाने नमूद केलेले नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांना एकूण २७८ पृष्ठांची माहिती देण्यात आली असल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कारनाळे नारायण नागनाथ, मु.उजना, पो.गंगाहिप्परगा,ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजय माधवराव चिद्रे, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरी,ता.जि.लातूर - डॉ. कंडारकर के.एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - डॉ.बोडके एन.डी.,प्रशासन अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ श्रीमती एम.व्ही.चिद्रे (अपिलार्थी यांची पत्नी) यांच्यासंदर्भात एकूण १५ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्यावेळी स्वाईन फ्लूच्या प्रादुर्भावामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.लातूर यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत नि:शुल्क माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.११.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवली आहे. ती अपिलार्थीस दि. २३.११.२००९ रोजी प्राप्त झाल्याची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या दि. १५.०२.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि त्यांना एका मुद्यावर (मुद्दा क्र. ११ संदर्भातील) माहिती योग्य मिळाली नाही, असे म्हटले आहे. तो मुद्दा म्हणजे "श्रीमती चिद्रे आ.से.यांना दि.२२.०९.०८ च्या कार्यालयीन आदेशान्वये लावण्यात आलेली (५६) तास, ४८ तासांची डयुटी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ च्या कोणत्या नियमान्वये लावण्यात आली ? अथवा इतर कुठल्या नियमानुसार लावण्यात आली त्या नियम/शासन निर्णय/परिपत्रक याची छायाप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी." याबाबत आयोगाने विचाराणा केली असता, जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना अपेक्षित असलेल्या शासन निर्णय/परिपत्रक याबाबत व इतर मुद्यांसंदर्भातील माहिती त्यांच्याकडील दि. १७.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस यथोचित कळविलेले आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजय माधवराव चिद्रे, सहायक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, निलंगा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरी, ता. जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,औसा,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, औसा, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, औसा, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, औसा, जि.लातूर- श्री. मोहन र.नळदकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे वकील,जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. ही बाब अपिलार्थी यांचे वकील तसेच

जन अपिलीय अधिकारी यांनी मान्य केली. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,औसा,जि.लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तहसीलदार, औसा, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२३.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी, तेरणा प्रकल्प वसाहत,निलंगा,ता.निलंगा,जि.लातूर-४१३ ५२१

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिध्दलिंगप्पा चनबसप्पा राजोळे, : अपिलार्थी

रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कर अधीक्षक, नगर परिषद, लातूर - श्री. मुतंगे ओ.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे लातूर विभागातील नगर परिषदेतील

सर्व्हेनंबर १४७ मधील खाजगी प्लॉट नं. २५ च्या संदर्भात तज्ञांची समिती पाठवून पंचनामा केला किंवा कसे,पंचनाम्याची प्रत, पंचनामा न केल्यास त्याची कारणे व या जागेवर निष्कलंक ताबा कोणाचा आहे, याचा पंचनामा करावा, अशी माहिती मागितली होती. यासंदर्भात दि. १६.०७.२००९ रोजी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ते देय होत नाही, असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १३.०१.२०१० रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०७.२००९ रोजी योग्य कळविले आहे, असा निर्णय घेऊन अपील फेटाळले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता व अपिलार्थी यांच्या मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपील निकाली काढण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दलिंगप्पा चनबसप्पा राजोळे, रा.मंठाळे नगर,सर्वे नं. १४७, प्लॉट नं. २५, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर,<br>रा.गंगापूर, ता.जि.लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर -श्री. संतोष अशोक हराळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. एन.एम.बेग,अधीक्षक,सा.प्र.वि. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०३.११.२००९ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जान्वये गंगापूर या गावाची सन २००२-०७ या कालावधीची दारिद्रयरेषेखालील नागरिकाची यादी मुल्यांकननिहाय मागितली आहे. या गावामध्ये एकूण ११०७ कुटुंबे असून त्यापैकी ३२२ कुटुंबे दारिद्रयरेषेखाली नियमानुसार आलेली आहेत. या सर्वांची माहिती दि. ३०.११.२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः घेतली आहे, याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर, मु.पो.गंगापूर, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी,<br>रा.टेंभुर्णी, ता.अहमदनगर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात पडताळणी समिती,विभाग औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी, जात पडताळणी-क्र.१ समिती, विभाग क्र.१,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद - श्रीमती छाया कुलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. सोनवणे, जनसंपर्क अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. देविलाल मानसिंह राजपूत यांची सन २००७ मधील वैधता प्रमाणपत्र संचिकेची व वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत अशी माहिती मागितली आहे. यापैकी संपूर्ण संचिकेची प्रत दि. १४.०८.२००८ रोजी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली आहे व वैधता प्रमाणपत्राची छायाप्रत कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे व उपलब्ध होताच देण्यात येईल, असेही कळविण्यात आले आहे. त्यांनी पुढे असेही आयोगास अवगत केले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सदरची माहिती एक महिन्याच्या आत शोधून अपिलार्थीस देण्यात यावी, असा दि. १६.०१.२०१० रोजी निर्णय घेतला आहे. त्यानुसार माहितीचा शोध घेण्यात आला. तथापि माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. दरम्यानच्या कालावधीत त्यांचे कार्यालय स्थलांतरित झाले व संबंधित लिपीकाची बदली झाली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता सदर वैधता प्रमाणपत्राचा शोध जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दोन कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करुन घेण्यात यावा व प्राप्त होताच अपिलार्थीस विनामूल्य देण्यात यावे, ही कार्यवाही एक महिन्याचे आत करण्यात यावी.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दोन कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करुन वैधता प्रमाणपत्राचा शोध घेऊन माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, ही कार्यवाही एक महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु.टेंभूर्णी पो.ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी

समिती क्र.१, विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकरी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पिराजी बाबुराव गोरे,<br>रा. गांजुरवाडी, ता.चाकूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,चाकूर,जि.लातूर - श्री. जिवनदास शिवाजी निरंजन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, चाकूर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, चाकूर, जि. लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.

२६.१०.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये एकूण १८ मुद्यांची माहिती सन १९९५ ते २००८ या कालावधीची मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कार्यालयात उपस्थित राहून पाहण्यासाठी अपिलार्थीस दि. १८.०१.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. १९.०१.२०१० रोजी उपस्थित राहून उपलब्ध माहितीची पाहणी केली, याबाबतची पोच त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पिराजी बाबुराव गोरे, रा.गांजूरवाडी,पो. गांजूर,ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धर्मराज गिरजाप्पा सोनकवडे, : अपिलार्थी
रा.वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक, शिक्षण विभाग,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. धर्मराज गिरजाप्पा सोनकवडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.),जि.प.लातूर - प्रतिनिधी - श्री. फड आर.बी. वरिष्ठ सहायक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर - प्रतिनिधी - श्री. जरगर एस.एच.,शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, दि. १०.११.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.लातूर यांच्याकडून खालील तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे.

"१)दि. १४/०९/२००५ या तारखेपासून आज पर्यंत शिक्षक व कनिष्ठ लिपीक यांना दिलेल्या वैयक्तिक मान्यतेची यादी शाळानिहाय मिळणेबाबत.

२) दि. १४/०९/२००५ पासून किती अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे (शिक्षक व कनिष्ठ लिपीक) यांचे समायोजन कोठे-कोठे कार्यालयाने केलेली शाळानिहाय यादी मिळणेबाबत.

३) शैक्षणिक वर्ष २००५-०६, २००६-०७, २००७-०८, २००८-०९,२००९-१० या वर्षांची अतिरिक्त कर्मचाऱ्यांची (शिक्षक,लिपीक,सेवक) यांची यादी मिळणेबाबत. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

यापैकी मुद्दा क्र. १ व २ या दोनही मुद्यांसंदर्भातील माहिती देय होत नाही, असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दि. ०७.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगाच्या नजरेस ही बाब आणून दिली आहे की, कोणत्याही पदासंदर्भात शिक्षणाधिकारी (मा.),जि.प. यांनी वैयक्तिक मान्यता दिल्याशिवाय शाळेकडून संबंधित शिक्षकास वेतन प्राप्त होऊ शकत नाही. ही बाब विचारात घेता तसेच सदरची वैयक्तिक मान्यता कार्यालयीन कामाकाजात (Public activity)अंतर्भूत होत असल्यामुळे त्यासंदर्भात निर्माण होणारी कागदपत्रे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' च्या व्याख्येशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस देय होत आहेत व ती कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागतील. ही माहिती शाळानिहाय ठेवण्यात आली नसून एकत्रित संपूर्ण जिल्हयाची ठेवण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सुनावणीच्या वेळी सांगितले. या परिस्थितीत संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल, असे आयोगाचे मत आहे.तथापि या माहितीची व्याप्ती व कालावधी पाहता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) अनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहणीकरिता उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होत आहे.याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्यांच्या छायांकित प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ - अतिरिक्त कर्मचारी (शिक्षक,लिपीक व सेवक) यांच्या सन २००५-२००६ ते २००९-२०१० या पाच वर्षांच्या कालावधीतील यादीबाबत आहे. याबाबतची माहिती अपिलार्थीस दिल्याचे त्यांनी युक्तिवादामध्ये सांगितले. तथापि ती अपूर्ण व चुकीची दिल्याचे अपिलार्थी यांनी आयोगास अवगत

केले. उदाहरणादाखल त्यांना मुद्दा क्र. ३ संदर्भात दिलेल्या माहितीमध्ये, श्री. मारुती शेटीबा बनसोडे, माध्यमिक शिक्षक, प्रियदर्शनी विद्यालय, साकोळ यांच्या नावाचा समावेश नाही. तथापि प्रत्यक्षात संबंधित शिक्षकाच्या पदाचा अतिरिक्त संवर्गात समावेश झालेला आहे, असा अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद आयोगास सादर केला. मुद्दा क्र.३ ची माहिती पूर्ण व योग्य आहे किंवा कसे, याबाबत शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना चौकशी करावी लागेल या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. ही कार्यवाही एक महिन्याच्या आत करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित सर्व अभिलेखे माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ७(९) अन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पाहणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२) अपिलार्थीस प्राप्त झालेली मुद्दा क्र. ३ ची माहिती पूर्ण व योग्य आहे किंवा कसे, याबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी चौकशी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धर्मराज गिरजाप्पा सोनकवडे, रा.वलांडी, ता.देवणी,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.)जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय,मध्यवर्ती इमारत,१७,डॉ.आंबेडकर मार्ग,ससून हॉस्पीटलजवळ,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालाजी किशनराव गादगे, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, पंडित दीनदयाळ उपाध्याय प्राथमिक
विद्यामंदिर उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, पंडित दिनदयाळ उपाध्याय प्राथमिक विद्यामंदिर, उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर - श्री. विलास जोशी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पंडित दिनदयाळ उपाध्याय प्राथमिक विद्यामंदिर उदगीर,जि.लातूर यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात सन १९९५-९६ ते २००७-०८ या कालावधीची विस्तृत अशी माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१२.२००९ रोजी सुनावणी घेतली आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मागितलेल्या सर्व मुद्यांवर मुद्देनिहाय आढावा घेऊन त्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. अपिलार्थीस ११ मुद्यांपैकी एकूण सात मुद्यांची (मुद्दा क्र. १,२,३,४,५,६) माहिती सुनावणीच्या वेळी दिल्याचे आढळून आले व उर्वरित माहिती सुनावणीनंतर अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देण्यात आली आहे.

आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या दि. ०८.०३.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना देय होत असलेली माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. परंतु त्यातील काही कागदपत्रे खोटी, अपुरी व दिशाभूल करणारी आहेत, असे मोघमपणे नमूद केले आहे. त्यामुळे त्यावर विचार करता येणे शक्य नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०७-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी किशनराव गादगे, विकास नगर,देगलूर रोड,उदगीर,ता.उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पंडित दिनदयाळ उपाध्याय प्राथमिक विद्यामंदिर, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुगळे नागनाथ ग्यानोबा, : अपिलार्थी
रा.करजगाव, ता.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था,लातूर - श्री.डी.आर.मुकदम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री.बेग एन.एम.अधीक्षक,सा.प्र.वि. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था,लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०५.११.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये लातूर जिल्हयातील प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत विविध कामांची माहिती मागितली आहे. सदरची माहिती कार्यालयात एकत्रित करुन दि. ०५.१२.२००९ रोजी अपिलार्थीस पाठविण्यात आली. तथापि अपिलार्थी यांनी सदरची माहिती स्वीकारली नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या मुद्दा क्र. १ ची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलावरील सुनावणीनंतर अपिलार्थीस परत माहितीचा एक संच दि. ०२.०२.२०१० रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविण्यात आली आहे. या सर्व बाबींवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुगळे नागनाथ ग्यानोबा, मु.पो.करजगाव,ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नागरगोजे बळीराम सोपान,<br>रा.रामवाडी, ता.चाकूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>परीक्षक वन अधिकारी, अहमदपूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>वन परीक्षक अधिकारी, अहमदपूर, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वनपरिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर - श्री. आर.जी.मुरुमवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय वन अधिकारी,उस्मानाबाद -प्रतिनिधी - श्री. आर.एम.जोशी, लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी दि. १५.०३.२०१० रोजीच्या

द्वितीय अपील अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे जोडली असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बळीराम सोपान नागरगोजे, मु.रामवाडी, पो.महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.